कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२६-२७/६९०
दि. २९/०६/२०२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्तानी संगीत व नृत्य विभागातर्फे आयोजित “प्रतिभा” ही मासिक संगीत सभा शुक्रवार दिनांक २६ जून २०२६ रोजी कला अकादमीच्या कृष्णकक्षात संपन्न झाली. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले याप्रसंगी कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. शंकर गावकर, संगीत विभागाच्या संचालिका डॉ. सपना नाईक व सर्व अध्यापक वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कथ्थक नृत्याने झाली यामध्ये कु. पियु निमकर, कु. अर्पिता पुनाजी, कु. गौरक्षा साळस्कर व कु. रेनीषा मांद्रेकर या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. त्यानंतर तबला एकलवादनाचा कार्यक्रम झाला त्यामध्ये कु.कौस्तुभ च्यारी याने ताल तीनताल पेश केला. तबलावादनानंतर शास्त्रीय गायनाच्या कार्यक्रमात कु. वरद तारी यांनी बिहाग रागात विलंबित ख्याल सादर केला .त्यानंतर संवादिनी सोलो वादन झाले यामध्ये कु.साहिल आमोणकर यांनी यमन राग सादर केला. व नंतर कार्यक्रमाची सांगता भरतनाट्यम नृत्याने झाली यामध्ये कु. सुहानी नाईक, कु. अदिती अनिश, कु.सौम्या नाईक, कु. मनवी गावस, कु. आभा नाडकर्णी, कु. गिना पाडगावकर,कु. श्राव्या शेट,कु. शताक्षी फळगांवकर व कु.अनुश्री कोली या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

सर्व कलाकारांना तबल्यावर श्री. श्रीपाद चारी, श्री. भार्गवराम गर्दे, व श्री. प्रज्योत ताम्हणकर यांनी साथसंगत केली तर संवादिनीवर श्री. शुभम नाईक व कु. उत्कर्षा फोंडेकर यांनी साथ दिली. नृत्याच्या कार्यक्रमाला डॉ. सपना नाईक यांची नटवंगम साथ, सौ. वरदा बेडेकर यांची पढंत साथ, डी.आर. चेथनमूर्ती यांची मृदंगम साथ व डॉ.दिप्था रूबसुंदरम यांची गायनसाथ लाभली होती.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वरदा बेडेकर यांनी केले तर श्री. शुभम नाईक यांनी सर्वांचे आभार मानले या कार्यक्रमाला भरपूर संख्येने विद्यार्थी, पालक व रसिक श्रोते उपस्थित होते.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)